पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवरील चंद्रपूर, राजूरा व मूल पोलीस उपविभागामधील पोलीस ठाणीं व उप पोलीस ठाण्यांची पुनर्मांडणी करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-२७१५/प्र.क्र. २२६/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : ०६ एप्रिल, २०१८.

वाचा :-

१) गृह विभाग, शासन निर्णय क्र.अेपीओ-२७१५/प्र.क्र.२२६/पोल-३, दिनांक ०९.०१.२०१८.

२) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे पत्र क्र.पोअच/सिबी-१/उपविपोअ निर्मिती/चिमूर/२०१८, दिनांक २४.०२.२०१८

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/चंद्रपूर-चिमूर/२०७/२०१५, दिनांक २७.०२.२०१८.

प्रस्तावना :-

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवरील वरोरा व ब्रम्हपूरी पोलीस उपविभागाचे विभाजन करुन नवीन चिमूर पोलीस उपविभाग निर्माण करण्यास व तद्नुषंगाने सदर पोलीस उप विभागांमधील पोलीस ठाण्यांची पुनर्मांडणी करण्यास उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथे नमूद दिनांक ०९.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र.०२ येथे नमूद दिनांक २७.०२.२०१७ च्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवरील चंद्रपूर, राजूरा व मूल या पोलीस उपविभागांमधील गुन्ह्यांची सरासरी लक्षात घेता सदर पोलीस उपविभागांवर गुन्ह्यांचा पडणारा ताण कमी करण्याकरीता उक्त पोलीस उपविभातंर्गत पोलीस ठाणीं व उप पोलीस ठाण्यांची पुनर्मांडणी करणेबाबत शासनास विनंती केली आहे. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी उक्त पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवरील चंद्रपूर, राजूरा व मूल या पोलीस उपविभागांमधील पोलीस ठाणीं व उप पोलीस ठाण्यांची खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार पुनर्मांडणी करणेबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पोलीस उपविभाग	सद्यस्थितीत पोलीस उपविभागामध्ये समाविष्ट असणारी पोलीस ठाणी व उप पोलीस ठाणी	पुर्नमांडणी केल्यानंतर पोलीस उपविभागातंर्गत समाविष्ट असणारी पोलीस ठाणी व उप पोलीस ठाणी
१.	चंद्रपूर पोलीस उपविभाग	१. चंद्रपूर शहर पोलीस ठाणे २. रामनगर पोलीस ठाणे ३. दुर्गापूर पोलीस ठाणे ४. पडोली पोलीस ठाणे ५. घुग्गूस पोलीस ठाणे ६. बल्लारपूर पोलीस ठाणे	१. चंद्रपूर शहर पोलीस ठाणे २. रामनगर पोलीस ठाणे ३. दुर्गापूर पोलीस ठाणे ४. पडोली पोलीस ठाणे ५. घुग्गूस पोलीस ठाणे
२.	राजुरा पोलीस उपविभाग	१. राजुरा पोलीस ठाणे २. कोठारी पोलीस ठाणे ३. विरुर पोलीस ठाणे ४. गोंडपिंपरी पोलीस ठाणे ५. धाबा (उप पोलीस ठाणे) ६. लाठी (उप पोलीस ठाणे) ७. उमरी पोतदार (उप पोलीस ठाणे)	१. राजुरा पोलीस ठाणे २. कोठारी पोलीस ठाणे ३. विरुर पोलीस ठाणे ४. बल्लारपूर पोलीस ठाणे ५. धाबा (उप पोलीस ठाणे) ६. लाठी (उप पोलीस ठाणे)

३.	मूल पोलीस उपविभाग	१. मूल पोलीस ठाणे २. पोंभूर्णा पोलीस ठाणे ३. सावली पोलीस ठाणे ४. पाधरी पोलीस ठाणे	१. मूल पोलीस ठाणे २. पोंभूर्णा पोलीस ठाणे ३. सावली पोलीस ठाणे ४. पाधरी पोलीस ठाणे ५. गोंडपिंपरी पोलीस ठाणे ६. उमरी पोतदार (उप पो.ठा.)

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०६१७२७११५८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.04.06 17:29:49 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

८. जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
९. पोलीस अधीक्षक, चंद्रपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
१३. वित्त विभाग, कार्यासन व्यय-७/ वित्तीय सुधारणा-१.
१४. निवड नस्ती, पोल-३.